# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात महिला चालक-वाहकांच्या नियुक्या प्रलंबित असल्याबाबत

**(१) १६०५२ (२९-१२-२०२२) डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागातील महिलांना रोजगार मिळावा म्हणून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात चालक-वाहक पदासाठी आदिवासी आणि दुष्काळग्रस्त भागातील महिलांची निवड करण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने घेतला असून परिवहन महामंडळात २१५ महिलांची चालक-वाहक म्हणून निवड केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना आणि त्यानंतर संपामुळे महामंडळाने आर्थिक तोटा वाढल्याने महिलांच्या भरतीला स्थगिती दिल्यामुळे निवड झालेल्या २१५ महिला चालक-वाहक यांच्या नियुक्त्या झाल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निवड झालेल्या महिला चालक-वाहक यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०१-२०२४) :** (१),(२),(३) व (४) सन २०१९ अंतर्गत चालक तथा वाहक पदाकरीता घेण्यात आलेल्या सरळसेवा भरतीमध्ये २०६ महिला उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे सदर २०६ महिला उमेदवारांनी हलके मोटार वाहन चालन परवाना सादर केलेला आहे. ज्या महिला उमेदवारांनी अवजड वाहन चालविण्याचे १ वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण करुन अवजड वाहन चालन परवाना सादर केलेला आहे, अशा एकूण १३१ महिला उमेदवारांना ८० दिवसाचे सेवापूर्व प्रशिक्षण देण्यात येत असून त्यापैकी ३६ महिला उमेदवारांनी ८० दिवसाचे सेवापूर्व प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे व ९५ महिला उमेदवारांचे ८० दिवसाचे सेवापूर्व प्रशिक्षण सुरु आहे.

तसेच, १९ महिला उमेदवारांचे १ वर्षाचे अवजड वाहन चालविण्याचे प्रशिक्षण सुरु आहे, व १६ महिला उमेदवारांचे १ वर्षाचे अवजड वाहन चालविण्याचे प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे. परंतु त्यांची प्राथमिक वाहन चालक चाचणी बाकी आहे. उर्वरीत ४० महिला उमेदवार हजर होणेसाठी कळवून देखील गैरहजर आहेत.

---

## वर्धा (जि.वर्धा) शहरात अमृत योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(२) १७५१३ (२५-०३-२०२३) श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा (जि.वर्धा) शहरात अमृत योजनेंतर्गत तसेच पिपरी मेघे व इतर १३ गावांतील पाणीपुरवठा योजनेची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाणीपुरवठा योजनेची कामे निकृष्ट दर्जाची करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१), (२) व (३) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत वर्धा शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली असून सदर प्रकल्पाच्या कामाचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण विश्वेश्वरया राष्ट्रीय प्रौद्योगिक संस्थान यांचे मार्फत करण्यात आलेले असून त्यानुसार सदर प्रकल्पातील कामे गुणवत्तापूर्ण झाल्याचे आढळून आलेले आहे. सद्य:स्थितीस प्रकल्पातील कामे पूर्ण झाली असून नगरपरिषद मार्फत शहरास नियमित पाणीपुरवठा सुरु आहे.

पिपरी मेघे व १३ गावे वाढीव प्रादेशिक पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम जल जीवन मिशन अंतर्गत असून सदर काम विहित कालमर्यादेत पूर्ण करता न आल्यामुळे कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली असून सदरील योजनेची कामे अंतिम टप्प्यात असून योजनेतील सर्व गावांना सुरळीत पाणीपुरवठा सुरु करण्यात आला असल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कळविले आहे.

---

## अमरावती जिल्ह्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस चालक-वाहक यांची ग्रामीण भागात मुक्कामी राहण्याची व्यवस्था करण्याबाबत

**(३) १७६३४ (२५-०३-२०२३) श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस चालक-वाहक यांची ग्रामीण भागात मुक्कामी राहण्याची सुविधा व व्यवस्था नसल्यामुळे बस चालक-वाहक यांना बसमध्येच रात्रीचा मुक्काम करावा लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अमरावती जिल्ह्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस चालक-वाहक यांची ग्रामीण भागात मुक्कामी राहण्याची व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०२-२०२४) :** (१) होय.

(२) व (३) अमरावती विभागामध्ये ग्रामीण भागात रात्रवस्तीस मुक्कामी असणाऱ्या ५० ठिकाणींपैकी १४ ठिकाणी चालक/वाहकांच्या निवासाची सुविधा उपलब्ध असून उर्वरित ठिकाणी मुक्कामाची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत आगार व्यवस्थापकांमार्फत आगार पातळीवरुन संबंधित गावच्या सारपंचाशी पत्रव्यव्हार करण्यात येऊन विनंती करण्यात आली आहे. व तद्नुषंगाने ज्या ठिकाणी अद्याप सुविधा उपलब्ध नाही त्या ठिकाणी मुक्कामची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेकडून डोंबिवली येथील इमारतींना नियमित व मुबलक पाणीपुरवठा करण्याबाबत

**(४) १८७८६ (२०-०६-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण – डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील श्री साईराज पार्क हौसिंग सोसायटी, राजाजी पथ, म्हात्रे नगर, डोंबिवली (पूर्व) येथील इमारतींना गत सहा महिन्यांपासून महानगरपालिकेकडून अपुरा पाणीपुरवठा करण्यात येत असल्याने रहिवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याची बाब दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारतींना होत असलेल्या अपुऱ्या पाणी पुरवठ्याबाबत रहिवाशांनी कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेकडे सातत्याने लेखी निवेदन देवूनही तसेच वारंवार पाठपुरावा करुनही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी तक्रारीचे निवारण अद्यापही केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त सोसायटीमध्ये वास्तव्यास असलेल्या रहिवाशांना अनियमित होणाऱ्या अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुंषगाने कल्याण – डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील श्री साईराज पार्क हौसिंग सोसायटी येथील इमारतींना होत असलेल्या अपुऱ्या पाणी पाणीपुरवठ्याच्या समस्येचे तातडीने निराकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-०३-२०२४) :** (१) सदर इमारतींना पाणीपुरवठा करणारी १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी ना दुरूस्त झाल्याने, सदर गृहसंकुलास कमी दाबाने पाणीपुरवठा होत होता.

•तसेच, नवीन जलवाहिनीचे काम होईपर्यंत सदर गृहसंकुलास टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) सदर इमारतीतील रहिवाश्यांकडून तक्रार प्राप्त झाल्यानंतर उक्त गृहसंकुलास महानगरपालिकेकडून सुरळीत पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

सदर तक्रारीचे निराकरण केले नाही, ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही.

(४) सदर गृहसंकुलास सुरळीत पाणीपुरवठा होणेसाठी नवीन ३ कनेक्शन देण्यात आले असून, सदर गृहसंकुलास पाणीपुरवठा पुरेसा दाबाने व सुरळीत सुरू झाला आहे.

सद्य:स्थितीत सदर गृहसंकुलास नियमित पाणीपुरवठा होत असून, संबंधितांची पाणी पुरवठ्याबाबत कोणतीही तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील व्यापाऱ्यांची तोतया अधिकारी बनून दरोडेखोरांनी लुट केल्याबाबत

**(५) १८७९३ (१९-०६-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील झवेरी बाजारात बुलियन व्यावसायिकाच्या कार्यालयात घुसून ६ जणांनी ईडीचे अधिकारी बनून सव्वा दोन कोटींची रोकड आणि ३ किलो सोने चोरी केल्याची घटना दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाप्रकारे पोलीस, गुन्हे शाखा, आयकर विभाग, सीबीआय आणि ईडी कारवाईची भीती दाखवून मुंबईतील अनेक व्यापाऱ्यांना लक्ष करण्याच्या घटनांत दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त घटनांचा तपास शासनाने केला आहे काय, तपासात काय आढळून आले आहे आणि मुंबईतील बनावट अधिकारी बनून व्यापाऱ्यांची लुट करणाऱ्या दरोडेखोरांना पायबंद करण्यासाठी तसेच त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे,

सदर प्रकरणी लोकमान्य टिळक मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.५०/२०२३, कलम ३९४, ५०६(२), १२०(ब), ३९५, १७० भा.द.वि., दिनांक २३/०१/२०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) होय.

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात अशाप्रकारे सन २०२३ मध्ये एकूण ६ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.
(३) सदर प्रकरणी पोलीसांकडून गुन्हा दाखल करुन तपास करण्यात आला आहे. तसेच अशा प्रकारच्या इतर प्रकरणांमध्ये पोलीस विभागास खबर प्राप्त होताच तात्काळ गुन्हा नोंद करून नमुद गुन्ह्याच्या तपासाअंती गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करुन त्यांना अटक करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतून दहा महिन्यांत २,५९८ वाहने चोरीला गेली असल्याबाबत

**(६) १८७९४ (१९-०६-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिसांनी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार माहे जानेवारी ते ऑक्टोबर, २०२२ या दहा महिन्यांच्या कालावधीत मुंबईतून तब्बल २,५९८ वाहने चोरीला गेली असल्याचे दिनांक १३ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने तपास केला आहे काय, तपासाअंती मुंबईतील वाहन चोरीच्या प्रकारांना आळा घालण्याबाबत कोणत्या उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यकक्षेतील विविध पोलीस ठाणे हद्दीतून माहे जानेवारी, २०२२ ते ऑक्टोंबर, २०२२ अखेर या कालावधीत २६०२ वाहने चोरीस गेलेले असून या प्रकरणी २५९८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दाखल गुन्ह्यांपैकी १२९३ गुन्हे उघड झाले आहेत. वाहन चोरी जाणाऱ्या बहुतांश ठिकाणी सीसीटीव्ही, नाकाबंदी, प्रभावी गस्त, इ. उपाययोजनांद्वारे वाहन चोरीवर नियंत्रण मिळविण्यासाठी पोलीसांकडून प्रयत्न करण्यात येतात. तसेच लोकांनी वाहनावर जीपीएस सिस्टीम बसवावी यासाठी पोलीसांकडून जनजागृती करण्यात येते असते. याव्यतिरीक्त नंबर प्लेट बनविणारे तसेच चाव्या बनविणाऱ्या इसमांवर सतत निगराणी ठेवून त्यांचे नोंदणीपुस्तक तपासण्यात येणे, घटनास्थळाचा डम डाटा प्राप्त करुन घेणे, जेल रिलीज झालेल्या आरोपींची सद्य:स्थिती तसेच त्यांच्या हालचालीवर गुन्हे प्रकटीकरण पथक तसेच गोपनीय बातमीदारांकडून माहिती घेणे, इ. उपाययोजना पोलीस विभागाकडून राबविण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेंतर्गत ची प्रकरणे विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित असल्याबाबत

**(७) १९०६९ (०८-०८-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिकेची काही प्रकरणे मा.उच्च न्यायालय, औद्योगिक आणि कामगार न्यायालय, दिवाणी न्यायालय, जिल्हा सत्र न्यायालयासमोर प्रलंबित असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणे साधारणत: किती वर्षांपासून प्रलंबित असून ही प्रकरणे निकाली काढण्याकरीता महानगरपालिकेच्या विधी विभागाने कोणती कार्यवाही केली तसेच या न्यायालयीन प्रकरणाचे स्वरूप लक्षात घेता या सर्व प्रकरणांमध्ये मागील पाच वर्षामध्ये विधी विभागामार्फत एकूण किती खर्च करण्यात आला,
(३) असल्यास, सदर प्रकरणांचा निपटारा होण्याकरीता विधी विभागाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेचे न्यायालयीन प्रकरणे महानगरपालिकेच्या विधी विभागामार्फत हाताळण्यात येतात. मार्च २०२३ पर्यंत न्यायालयीन निहाय खालीलप्रमाणे प्रकरणे प्रलंबित आहेत.

१) सर्वोच्च न्यायालय - १२

२) उच्च न्यायालय - ५१८

३) जिल्हा व सत्र न्यायालय - २६२

४) दिवाणी न्यायालय (वरिष्ठस्तर) - ४५१

५) दिवाणी न्यायालय (कनिष्ठस्तर) - ८७१)

६) औद्योगिक व श्रम न्यायालय - ३३३

असे एकूण २४४७ प्रकरणे प्रलंबित आहे.

(२) व (३) एकूण प्रलंबित २४४७ प्रकरणापैकी अंदाजे १०३ प्रकरणे १० वर्षे जुनी व ३६७ प्रकरणे ५ वर्ष जुनी आहेत. वर्ष २०१५ पर्यंत महानगरपालिकेत अधिवक्तांची नियुक्ती मासिक मानधनावर होत होती सन २०१५ मध्ये विधी विभागाकडून प्रायोगिक तत्वावर मासिक मानधनाच्या धोरणात बदल करून प्रकरणनिहाय अधिवक्तांची नियुक्ती व देयके अदा करण्याचे धोरण स्थायी समितीच्या ठराव क्र. १५३ दिनांक २७/०८/२०१५ अन्वये राबविण्यात आले. या धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये महानगरपालिकेच्या खर्चामध्ये अंदाजे ५० टक्के ची कमी निदर्शनास आली. त्यानुसार स्थायी समिती च्या ठराव क्र. २६ दिनांक २९/०४/२०१७ अन्वये सर्व न्यायालयांकरीता प्रकरण निहाय निश्चित फिस अधिवक्तांना देण्याचे धोरण आजपावेतो अंमलात आहे. या धोरणामुळे महानगरपालिकेची प्रकरणे निकाली काढण्याच्या क्षमतेत वाढ झाली असून आर्थिक खर्च अंदाजे ५० टक्केने कमी झालेला आहे.

वर्ष २०१८-२०२३ पर्यंत विधी विभागामार्फत अधिवक्तांना खालीलप्रमाणे फिस देण्यास आली आहे.

१) २०१८-१९रुपये ५५०८०३०/-

२) २०१९-२० रुपये ३८५०२९०/-

३) २०२०-२१रुपये १५५९८८६/-

४) २०२१-२२रुपये १४३५३७५/-

५) २०२२-२३रुपये ३६४५५८१/-

उक्त खर्चामध्ये आर्बिट्रेशन फिस व विशिष्ट प्रकरणांमध्ये पदनिर्देशित वरिष्ठ अधिवक्ता यांच्या फिसचा समावेश असून वर्षनिहाय त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) २०१८-१९ रुपये २१७००००/-

२) २०१९-२० रुपये ५७२०००/-

३) २०२०-२१ रुपये १०००००/-

४) २०२१-२२ रुपये निरंक

५) २०२२-२३ रुपये १२२५०००/-

(४) विलंबाची विविध कारणे खालीलप्रमाणे आहे: १) संबंधित न्यायालयावरील कामाचा बोझा,

२)वादी किंवा प्रतिवादी यांची किंवा त्याच्या अधिवक्तांची उपलब्धता व त्यांची वैयक्तिक कारणे,

३) कोव्हिड १९ मुळे वर्ष २०२० ते २०२१ मध्ये मोठ्या प्रमाणात न्यायालयीन कामकाज होऊ शकले नाही.
प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याकरीता अधिवक्तांच्या सल्ल्यानुसार प्रकरण निहाय विविध उपाययोजना महानगरपालिकेच्या स्तरावर करण्यात येत आहे.

---

## राज्यातील हस्ताक्षर तज्ज्ञांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(८) १९१५२ (०४-०८-२०२३) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील फौजदारी प्रकरणात दोष सिध्दीसाठी अत्यंत महत्वाचा असलेला हस्ताक्षर तज्ज्ञांचा अहवाल सादर करण्यासाठी फक्त १५ तज्ञ असून १५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, न्यायवैद्यक विभागास किमान ३५ हस्ताक्षर तज्ज्ञ कर्मचाऱ्यांची गरज भासत असल्याने सदरची पदे भरण्याबाबत 'समर्थन ' मा.उप मुख्यमंत्री (गृह), मा.अपर मुख्य सचिव (गृह) यांच्याकडे पत्राद्वारे दिनांक ३ मे, २०२३ वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून साडेसात हजार कागदपत्रे तपासणीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे शासनाने माहिती व निर्णय घेऊन सदरील रिक्त पदे भरण्याबबात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२४) :** (१) अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाच्या अधिपत्याखालील हस्ताक्षर व छायाचित्रण विभागामध्ये एकूण ४० पदे मंजूर आहेत. यापैकी, सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षकांची एकूण १५ पदे रिक्त आहेत.
(२) होय, हे खरे आहे. तथापि, सदरहु विभाग न्यायवैद्यक विभागाच्या अधिपत्याखाली नाही.
(३) हस्ताक्षर तज्ञ विभागात सप्टेंबर-२०२३ अखेर ७२९७ दस्तऐवज प्रकरणे प्रलंबित आहे.
(४) कोरोना कालावधीमध्ये पद भरतीस निर्बंध असल्याने भरती करण्यात आलेली नसून वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि २०२२/ प्र.क्र.२/ २०२२/आ.पु.क दिनांक ३१/१०/२०२२ नूसार पद भरती वरील निर्बंध शिथिल करण्यात आल्याने सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक यांची १५ रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिल्वासा येथे (दादरा आणि नगर हवेली) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस पाठविण्यात आल्याबाबत

**(९) १९५४१ (०८-०८-२०२३) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादरा आणि नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील सिल्वासा येथे मा.पंतप्रधान यांच्या दिनांक २५ एप्रिल,२०२३ रोजी च्या दौऱ्या वेळी भव्य रोड शो करीता महाराष्ट्र राज्यातील ७०० राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस तेथे पाठविण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील ७० गाड्या, अलिबाग-५, पेण-१८, माणगाव-१२, मुरुड-१०, रोहा-१० व कर्जत-१८ इ. बसेसचा समोवश होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे एप्रिल-मे महिन्यात शालेय सुट्टयांच्या कालावधीत मुंबईकरांना गावी जाण्याकरीता एसटीचाच पर्याय असल्याने सिल्वासा येथे राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस पाठविण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणी जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०१-२०२४) :** (१),(२) व (३) मा.पंतप्रधान यांच्या दिनांक २६/०४/२०२३ रोजीचे सेल्वासा येथील दौऱ्यावेळी विविध योजनांच्या लाभार्थीची वाहतूक करणेसाठी सेल्वासा प्रशासनाने रा.प. महामंडळाकडे विशेष बससेवेअंतर्गत बसेस पुरविण्याची विनंती केली होती. व त्यानुसार आगाऊ अनामत रक्कम स्विकारुन रा.प. महामंडळाने एकूण ५७८ बसेसचा विशेष बससेवेअंतर्गत सेल्वासा प्रशासनास पुरवठा केला होता.महाराष्ट्र राज्यातील प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून सर्व बसेस एकाच विभागांतून उपलब्ध करुन न देता नजीकच्या एकूण ०९ विभागांतून सदरच्या बसेस सेल्वासा येथे पाठविणेत आल्या होत्या. यामध्ये रायगड विभागातून एकूण ७० बसेस सेल्वासा येथे पाठविण्यात आल्या होल्या.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा न्यायालयांमध्ये ५० लाख ७३ हजार ७२६ खटले प्रलंबित असल्याबाबत

**(१०) २११०९ (०४-०१-२०२४) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा न्यायालयांमध्ये ५० लाख ७३ हजार ७२६ खटल्यांमध्ये फौजदारी खटल्यांची संख्या ३४ लाख ६६ हजार ४७७ एवढी असून, दिवाणी खटल्यांची संख्या १६ लाख ०७ हजार २४९ इतकी तर मुंबईत सर्वाधिक ८ लाख ३० हजार ८४९ प्रकरणे प्रलंबित असल्याची माहिती दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील जिल्हा न्यायालयात मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असलेल्या खटल्यांचा निपटारा होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२४) :** (१) होय, दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ रोजी ५० लाख ७१ हजार १३६ खटले प्रलंबित होते. त्यापैकी दिवाणी खटल्यांची संख्या १६,१०,११९ इतकी तर मुंबईत दिवाणी व फौजदारी खटले मिळून एकूण ८ लाख ३१ हजार ६६६ प्रकरणे प्रलंबित आहे, हे खरे आहे.
(२) विविध न्यायालयात प्रलंबित असलेले दावे निकाली काढण्यासाठी मा.उच्च न्यायालयाकडून विशेष मोहिम व विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या राज्य न्यायालय व्यवस्थापन प्रणाली समितीने सन २०१८ ते सन २०२२ तसेच सन २०२३ मध्ये राज्यातील विविध न्यायालयांत दाखल असलेले दावे जलद गतीने निकाली काढण्याकरीता कृति आराखडा तयार केला आहे. तसेच १० ते ४० वर्षे प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्याकरीता न्यायिक अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या आहेत. न्यायालयीन प्रकरणांचा निपटारा जलद गतीने करण्याकरीता न्यायिक अधिकाऱ्यांची पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. तसेच दिनांक १० जानेवारी, २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यात एकूण २८६३ न्यायिक अधिकाऱ्यांची पदे व ११,०६४ इतकी सहाय्यभूत पदे व ५,८०३ मनुष्यबळ बाहययंत्रणेद्वारे टप्प्या टप्प्याने भरण्यास मान्यता प्रदान केली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील न्यायालयीन कर्मचारी सुधारित वेतननिश्चितीपासून वंचित असल्याबाबत

**(११) २१२१५ (०४-०१-२०२४) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०२२ मध्ये मा.उच्च न्यायालयातील प्रथम व द्वितीय वर्ग कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती पूर्ण झाली असून सुधारित वेतनश्रेणीनुसार त्यांना वेतन देण्यात येते, वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची सुधारित वेतननिश्चिती अद्यापही पूर्ण झाली नसल्याची बाब दिनांक ७ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने त्याबाबत वर्ग ३ व ४ करीता माहे जानेवारी, २०२३ मध्ये समिती नेमून दहा महिने होऊनही अद्याप समितीचे काम पूर्ण झाले नसून समितीने चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची सुधारित वेतनश्रेणी निश्चित करतेवेळी कर्मचाऱ्यांचा रुजू होण्याचा दिनांक, वय, हुद्दा एक सारखे दाखविल्यामुळे असंख्य कर्मचाऱ्यांच्या वेतनात तफावत आढळून आल्याने कर्मचाऱ्यांची सुधारित वेतनश्रेणीत वेतननिश्चिती पुन्हा करण्याची न्यायालय प्रशासन व सचिव, विधी व न्याय विभाग (मंत्रालय) यांचेकडे तशी मागणी केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तृत्तीय वर्ग कर्मचाऱ्यांची (नागपूर व औरंगाबाद खंडपीठ वगळून) सुधारित वेतननिश्चिती झाली नसल्याचे व त्यामुळे मा.उच्च न्यायालयातील सुमारे साडेतीन हजार कर्मचारी अद्याप सुधारित वेतन निश्चितीपासून वंचित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे चौकशीच्या अनुषंगाने शासनाने तृत्तीय व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची सुधारित वेतनश्रेणी निश्चित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही.

सन २०२२ मध्ये वर्ग एक आणि वर्ग दोन मधील अधिकाऱ्यांची वेतननिश्चिती पूर्ण झाली असून त्यांना सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे वर्ग तीन व वर्ग चार मधील कर्मचाऱ्यांची सुधारित वेतननिश्चिती देखील पूर्ण झाली आहे. तथापि, वर्ग चार मधील कर्मचारी आणि वर्ग तीन मधील वाहन चालक कर्मचारी यांना ऑगस्ट २०२३ पासून सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन देण्यात येत आहे. याशिवाय, वर्ग तीन मधील इतर कर्मचाऱ्यांना सप्टेंबर २०२३ पासून सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन देण्यात येत आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

जानेवारी, २०२३ या महिन्यात शासनाद्वारे अशा प्रकारची कोणतीही समिती स्थापन करण्यात आलेली नाही. सुधारित वेतनश्रेणीनुसार वर्ग तीन मधील कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चितीचे काम पूर्ण झाले असून त्याचा प्रत्यक्ष लाभ त्यांना ऑगस्ट आणि सप्टेंबर, २०२३ पासून देण्यात आला आहे.

काही कर्मचाऱ्यांनी, वेतन तफावतीमुळे त्यांची सुधारित वेतननिश्चिती करण्याची विनंती केल्यानंतर प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, यांनी सुधारित वेतननिश्चिती आदेश आणि संबंधित कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके वेतन पडताळणी पथक, मुंबई यांच्याकडे पडताळणीसाठी अग्रेषित केली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जलसंपदा विभागातील वर्ग १ ते वर्ग ४ ची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) २१२८९ (११-०१-२०२४) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलसंपदा विभागामध्ये वर्ग 'क' ची ११९७७, वर्ग 'ड' ची ५००८ व वर्ग अ १४५ पदे रिक्त असून विशेषत विदर्भातील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ द्वारे वर्ग १ ते ४ संवर्गातील ६२५७ पदे रिक्त असल्याचे तसेच नागपूर विभागातील मुख्य अभियंता जलसंपदा विभागात एकूण ४४७५ मंजूर पदांपैकी १४६९ पदे भरली असून, ३००६ पदे रिक्त असल्याचे माहे १४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोसीखुर्द मुख्य अभियंता कार्यालयात देखील १८७२ पदांपैकी ८६९ पद भरली असून १००३ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, विदर्भातील सिंचन योजना पूर्ण करण्यासाठी रिक्त पदांमुळे अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलसंपदा विभागात मागील १२ वर्षांपासून कर्मचारी भरती झाली नसल्याने तसेच सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असून तांत्रिक व अतांत्रिक रिक्त पदाची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने तांत्रिक कामे करण्यासाठी कार्यरत तेथील कर्मचाऱ्यांवर अधिकचा ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी राज्यात जलसंपदा विभागात वर्ग ‘अ’ ते वर्ग ‘ड’ ची रिक्त पदे भरणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०६-०३-२०२४) :** (१) होय.

जलसंपदा विभागाच्या आस्थापनेवरील मंजूर पदांपैकी सद्य:स्थितीत ४९% पदे रिक्त आहेत.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत वर्ग १ ते ४ संवर्गात ६२५१ पदे रिक्त आहेत. नागपूर विभागातील मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर या प्रादेशिक कार्यालयाअंतर्गत सद्य:स्थितीत एकूण ४४७५ मंजूर पदांपैकी १४५९ पदे भरलेली असून ३०१६ पदे रिक्त आहेत.
(२) गोसीखुर्द मुख्य अभियंता कार्यालयात मंजूर १८७२ पदांपैकी ९०० पदे भरलेली असून ९७२ पदे रिक्त असून सिंचन व्यवस्थापनाची कामे करण्यास मर्यादा येत आहेत.
(३) अंशत: खरे आहे. तांत्रिक व अ तांत्रिक संवर्गातील रिक्त पदांचे कामकाज कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपवून करण्यात येत आहे.
(४) सरळसेवा भरती व पदोन्नतीच्या माध्यमातुन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्राथम्याने सुरु असून पदोन्नती व सरळसेवा नियुक्ती व्दारे विभागातील रिक्त पदांवर अधिकारी, कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील धर्मादाय आयुक्त कार्यालयांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१३) २१३६६ (०४-०१-२०२४) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील धर्मादाय आयुक्त कार्यालयातील रिक्त असलेली ५० टक्के पदे भरण्यासाठी लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे मागणी करूनही सदर पदे भरण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धर्मादाय आयुक्त कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२६-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) धर्मादाय संघटनेतील सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ या संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील २० रिक्त जागांचे मागणीपत्र व लिपिक-टंकलेखक, गट-क या संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील १४५ रिक्त जागांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आलेले आहे. यानुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील रिक्त पदांपैकी केवळ ५०% पदे भरण्यास अनुमती आहे. तथापि, धर्मादाय संघटनेतील कार्यालयांची प्रशासकीय निकड विचारात घेता,

धर्मादाय संघटनेतील भूतपुर्व दुय्यम निवडमंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गांतील नामनिर्देशनाच्या कोट्यातील १००% रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्याकरीता प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

धर्मादाय संघटनेतील भूतपुर्व दुय्यम निवडमंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गांतील १७६ रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी धर्मादाय आयुक्त कार्यालयाने टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस (टी.सी.एस.) लिमिटेड या कंपनीस दिनांक २१ जून २०२३ रोजी कार्यादेश/स्वारस्य पत्र दिले आहे. तसे, याबाबत दिनांक १८ डिसेंबर २०२३ रोजी करारनामा करण्यात आला आहे. यानुषंगाने टी.सी.एस. कंपनीद्वारे प्रकल्प समन्वयकाची नियुक्ती करण्यात आली असून, परीक्षेच्या आयोजनाच्या अनुषंगाने टी.सी.एस. कंपनीद्वारे पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्हयातील विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण करण्याबाबत

**(१४) २१५६८ (०५-०१-२०२४) श्री.विप्लव बाजोरिया : तारांकित प्रश्न क्रमांक १२३०१ ला दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाडा विभाग हे औद्योगिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचे विभाग असून तेथील प्रमुख शहरांमध्ये विमानतळे स्थापन करण्याची अत्यंत आवश्यकता असून, विदर्भात नागपुर वगळता तसेच मराठवाड्यात औरंगाबाद वगळता कोणतेही विमानतळ उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील अकोला जिल्हयामध्ये विमानतळाचा प्रश्न बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित असून तत्कालीन मा.मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी ६४ कोटी रूपये काही जागा भुसंपादन करण्यसाठी उपलब्ध करून दिले होते त्यानंतर कोणताही निधी अकोला विमानतळाकरीता शासनाकडुन प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण करण्याकरीता खाजगी जमिनीचे भुसंपादन करण्याची आवश्यकता असून त्याकरीता शासनाकडे १.२५ कोटी रूपयांची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, मागील १० वर्षांपासून स्थानिक आमदार यांनी विधीमंडळात विविध आयुधांद्वारे अकोला विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण करण्याबाबत प्रश्न उपस्थित केला व याबाबत प्रत्येकवेळा तत्कालीन शासनाने धावपट्टीच्या विस्तारकरणासाठी आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील अकोला जिल्ह्यातील विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण करण्याकरीता शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

विदर्भात नागपूर वगळता बिरसी(गोंदिया), मोरवा(चंद्रपूर), बेलोरा(अमरावती), शिवणी(अकोला), यवतमाळ तसेच, मराठवाड्यात औरंगाबाद वगळता नांदेड, लातूर, धाराशिव येथे विमानतळे उपलब्ध आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी दिनांक ४ मार्च,२०१४ व दिनांक १५ मार्च, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

अकोला विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण करण्याकरीता खाजगी जमिनीचे भूसंपादन करण्यासाठी रुपये ९५.४८ कोटी निधीची मागणी शासनाकडे करण्यात आली होती. परंतु या विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार १८०० मीटर पर्यंत करावयाचा किंवा २५०० मीटर पर्यंत करावयाचा याबाबत व्यवहार्यदृष्ट्या किफायतशीर स्थळ निश्चित करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी अकोला यांचे स्तरावरून सुरू आहे.

(४) होय.

(५) अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार हा १८०० मीटर पर्यंत किंवा २५०० मीटर पर्यंत करावयाचा याबाबत व्यवहार्यदृष्ट्या किफायतशीर स्थळ (क्षेत्र) निश्चितीबाबत कार्यवाही चालू आहे. स्थळ निश्चितीची कार्यवाही अंतिम झाल्यानंतर निधी उपलब्धतेबाबतची कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे टोकरतळे (ता.जि.नंदुरबार) शिवारातील प्रकल्पाकरिता संपादित जमिनीवरील अतिक्रमण काढण्याबाबत

**(१५) २१६३७ (०४-०१-२०२४) श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे टोकरतळे (ता.जि.नंदुरबार) शिवारातील शेत सर्वे क्र. १२८ मधील क्षेत्र १०.५१ आर जमीन तापी पाटबंधारे विकास महामंडळाने शिवन मध्यम प्रकल्पासाठी पूर्णत: संपादित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन संपादित करतांना जमिनीचा मोबदला मूळ जमीन मालकांना अदा करण्यात आलेला असताना देखील सदर जमिनीपैकी २-३ एकर जमिनीवर धरण क्षेत्रात भराव टाकून संचय पातळीपेक्षा सुमारे २४० मिटर उंचीवर अनधिकृतपणे अतिक्रमित बांधकाम करण्यात आले असल्याबाबत जलसंपदा विभागाने केलेल्या पाहणीत आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मूळ जमीन मालकाचे वारसदार यांनी संपादीत जमीन परत मिळण्याबाबत दाखल केलेली याचिका मा.न्यायालयाने दिनांक ०८ जुलै, २०१३ रोजी दावा खर्चासह नामंजूर करुन १० वर्षाचा कालावधी उलटून गेला तरीही अद्याप तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून सदरहू अतिक्रमित वास्तू निष्कासित किंवा ताब्यात घेण्याबाबत कोणतीच कार्यवाही न करता अतिक्रमण करणाऱ्याला पाठिशी घालण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू अतिक्रमित वास्तू ही धरणक्षेत्रात असून पर्यावरणास हानीकारक ठरत असल्याने सदर अनधिकृत बांधकाम ताब्यात घेण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मा.उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री, मा.अतिरिक्त सचिव, जलसंपदा, मा.जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्याकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

मौजे.टोकरतळे ता.जि.नंदुरबार शिवारातील सर्व्हे/गट नं.१२८चे एकूण क्षेत्र १०.१९ हे.आर असून सदर क्षेत्र शिवण मध्यम प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र म्हणुन भूसंपादन प्रस्ताव क्र.१५/९९ दिनांक २१/०६/२००१ रोजीच्या निवाड्याद्वारे संपादीत करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे आहे.

क्षेत्रिय स्तरावर वस्तुनिष्ठ चौकशी केली असता गट नं.१२८ मधील जमीनीवर साधारणत: २ ते ३ एकर मध्ये पूर्ण संचय पातळी पेक्षा जास्त उंचीवर बांधकाम केलेले आहे, तसेच सदर जमीन ही अतिक्रमीत असल्याचे दिसुन आले आहे.

(३) हे खरे नाही.

कार्यकारी अभियंता, धुळे मध्यम प्रकल्प विभाग क्र.२ नंदुरबार यांनी दिनांक ०८/०२/२०११ व दिनांक २३/०२/२०११ च्या पत्रान्वये सदर क्षेत्र सर्व्हे/गट क्र.१२८ चे जमीन मूळ मालकाना या क्षेत्रामधील इमारतीचे अनधिकृत बांधकाम काढुण टाकणे बाबत पत्र दिले होते. तसेच दिनांक ०८/०२/२०११ व ०१/०३/२०११ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता यांनी जिल्हाधिकारी नंदुरबार यांना हे अतिक्रमण काढणे बाबतच्या कार्यवाहीबाबत अवगत केले होते. या कार्यावाहीस निरंतराचा मनाई हुकूमासाठी व या क्षेत्रात अस्तित्वात पक्के बांधकाम दावा मिळकतीसाठी या क्षेत्राचे मूळ मालक यांचे वारसानी सह दिवाणी न्यायालय व स्तर, नंदुरबार यांचे न्यायालयात दिनांक २८/०२/२०११ रोजी दावा दाखल केला होता.
सदर दावा निकाल मे. न्यायालयाने दिनांक ०८/०७/२०१३ च्या न्याय निर्णयानुसार"आदेश दावा खर्चासह नामंजूर करण्यात आला आहे" असा दिलेला आहे.

(४) हे खरे आहे.

(५) सदर मागणीच्या अनुषंगाने नंदुरबार मध्यम प्रकल्प विभागीय पथक कार्यालय, नंदुरबार मार्फत दिनांक १६/११/२०२३ रोजी संबंधित जमीन मालक यांना "नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत स्वखर्चाने अतिक्रमण काढावे" याबाबत कळविण्यात आले आहे. तद्नंतर सदर नोटीसीच्या अनुषंगाने दिनांक २०/१२/२०२३ रोजी संबंधित जमीन मालकाने जिल्हाधिकारी, नंदुरबार व इतर यांचे विरूध्द दावा घोषणेसाठी तसेच तुर्तास मनाई हुकूमासाठी दिवाणी न्यायालय वरीष्ठस्तर नंदुरबार येथे नियमित दिवाणी दावा ११८/२०२३ दाखल केलेला आहे.मा.न्यायालयाने दिनांक २२/१२/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये "Status Quo over the suit house property till next date" असा आदेश पारित केलेला आहे. सदर बाब न्याय प्रविष्ट असल्याने न्याय निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्हयातील धरणगाव येथे बालकवी त्र्यंबक बापुजी ठोंबरे व आसोदा येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या स्मारकासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) २१८४२ (०४-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे : दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ११५४९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरणगाव व आसोदा (जि.जळगाव) येथील बालकवी त्र्यंबक बापुजी ठोंबरे व कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे स्मारकासाठी एक विशेष बाब म्हणून इतर जिल्हा योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, जळगाव यांना कळविण्यात आले असूनही अद्याप निधी उपलब्ध देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे स्मारकासाठी जिल्हा योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अजित पवार (१२-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही

(२) मौजे आसोदा, ता.जि.जळगांव येथील बहिणाबाई चौधरी यांचे स्मारक बांधकामासाठी रुपये ८२.९८ लक्ष निधी पूर्वोदाहरण म्हणून न धरता विशेष बाब म्हणून इतर जिल्हा योजनेतून उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार रुपये ८२.९८ लक्ष निधी सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध करुन देण्यात आला आहे. निधीसंदर्भात कोणतीही कार्यवाही प्रलंबित नाही.सदर स्मारकाच्या उर्वरित कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत पर्यटन विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला असून पर्यटन विभागामार्फत सद्य:स्थितीत रुपये ३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

बालकवी त्र्यंबक बापुजी ठोंबरे यांच्या स्मारकासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१२-१३ मध्ये रुपये ५५.१६ लक्ष रकमेची प्रशासकीय मान्यता देऊन, निधी देखील वितरीत करण्यात आलेला आहे

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अभियंत्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याबाबत

**(१७) २१८७२ (०४-०१-२०२४) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) बृहन्मुंबईतील महानगरपालिकेत सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान महापालिकेच्या डी वॉर्डातील सहाय्यक अभियंता व दुय्यम अभियंत्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २ लाख रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी अटक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दुय्यम अभियंत्याच्या बदलीसाठी माजी महापौर यांनी सन २०२० मध्ये शिफारस पत्र दिल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेतील बदल्यांमध्ये राजकीय हस्तक्षेपामध्ये भ्रष्टाचार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने महानगरपालिकेत झालेल्या भ्रष्टाचाराबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) I. तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात दिलेल्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने, तक्रारदार यांच्या दुचाकी वाहनाचे स्पेअर पार्टच्या दुकानाच्या पाठीमागे असलेल्या सोसायटीच्या सामाईक जागेमध्ये पावसाळी शेड बांधण्यासाठी रितसर परवानगी मिळण्यासाठी आलोसे क्र.१, दुय्यम अभियंता व आलोसे क्र.२, सहायक अभियंता यांनी तक्रारदार यांच्याकडे कॅलक्यूलेटरवर अंकामध्ये २००००० अशी संख्या दाखवून रुपये २,००,०००/- व तडजोडीअंती रुपये १,९०,०००/- इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईदरम्यान निष्पन्न झाले. तदनंतर ला.प्र.विभागामार्फत आयोजित सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र.१, दुय्यम अभियंता, नेमणुक-इमारत व कारखाने विभाग, डी विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना तक्रारदार यांच्याकडून रूपये १,९०,०००/- इतकी लाचेची रक्कम असलेले पाकिट स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आल्याने दोन्ही आरोपी लोकसेवकांविरुध्द ला.प्र.वि, मुंबई विभाग येथे दिनांक ०५/०७/२०२२ रोजी गु.र.क्र. ३१/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करुन त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली. सदर गुन्ह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्यामार्फत सुरु आहे.
II. तसेच या प्रकरणी दोन्ही आलोसे यांना बृहन्मुंबई महानगरपालिकाने उप आयुक्त (विशेष) यांच्या दिनांक २२/०८/२०२२ रोजीच्या आदेशान्वये, अटक केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक ०५/०७/२०२३ पासून पूर्वलक्षीप्रभावाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.
III. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम १९ मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दोन्ही आलोसे यांच्याविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्याकरीता दिनांक १८/०७/२०२३ रोजीच्या आदेशान्वये मंजुरी दिली आहे. तसेच या प्रकरणी दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने, संबंधित दोन्ही आलोसे यांची विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
IV. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेत कर्मचारी/अधिकारी यांच्या बदल्यांमध्ये राजकीय हस्तक्षेपामध्ये भ्रष्टाचार होत असल्याची बाब खरी नसल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी त्यांच्या दिनांक २२/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## कृषी सिंचनाच्या वापरकर्त्यांसाठी खाजगी उपसा सिंचन योजनांकरीता क्षेत्रावर आधारीत दर आकरणी करण्याबाबत

**(१८) २१९३३ (०५-०१-२०२४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी सिंचनाच्या वापरासाठी घनमापन पध्द्तीने पाणीपट्टीचे दर, क्षेत्र व पीक आधारित करतांना घेतलेल्या शासन निर्णयामधील क्र. २ मध्ये परिशिष्ट ‘‘क’’नुसार निश्चित केल्याप्रमाणे दर आकारणी निश्चित केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी दिनांक २३ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या दिलेल्या परिपत्रकानूसार सचिव (ला.क्षे.वि) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी खाजगी उपसा सिंचन योजनेकरीता क्षेत्रधारकांला जलदर हा प्रवाही सिंचनाच्या दरानुसार आकारणी करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रत्यक्षात खाजगी उपसासिंचन वापरकर्ते हे स्वत:च्या खर्चाने नदीपासून पाईप टाकून पाण्याचा वापर करतात त्यामुळे प्रवाही सिंचनाचे दर हे खाजगी उपसा सिंचन वापरकर्त्याला घनमापन मीटर पध्दतीने लागू करणे अन्यायकारक ठरणार आहे, हे ही खरे आहे काय ?
(४) असल्यास, कृषी सिंचनाच्या वापरकर्त्यांसाठी खाजगी उपसा सिंचन योजनाकरीता क्षेत्रावर आधारित दर आकारणी करण्यात यावी, यासाठी मा.उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा व लाभेक्षत्र विकास मंत्री यांना दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी उपसा सिंचन योजनांकरीता क्षेत्रावर आधारित दर आकारणी निश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०२४) :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दिनांक २९ मार्च, २०२२ च्या आदेशान्वये जलप्रशुल्क निर्धारण आदेशानुसार पाणीपट्टी आकारणी करण्याचे दर प्रसृत करण्यात आले आहेत. सदर दर प्रसृत करण्यापूर्वी याबाबत हरकती व सूचना मागविण्याची कार्यवाही करण्यात आली होती. तदनंतर दर प्रसृत करण्यात आले आहे. तसेच जलमापन पध्दतीच्या दरानुसार दर लावल्यास यावर देण्यात येणारे दरशुल्क हे योग्य आहे. तथापि, जलमापन यंत्र लावण्यासाठी असलेल्या संक्रमण कालावधीमध्ये क्षेत्रावर आधारित पीकनिहाय दर देण्याची तरतूद दिनांक २९/०३/२०२२ च्या आदेशामध्ये नमूद केलेली आहे व दिनांक ०२/०२/२०२४ च्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या ठोक जलप्रशुल्क निर्धारण सुधारणा आदेशान्वये संक्रमण कालावधी हा दिनांक ३०/०६/२०२५ पर्यंत देण्यात आलेला आहे.
(४) होय.
(५) शासन पत्र, दिनांक ०३/०१/२०२४ अन्वये, ठोक जलप्रशुल्क दरातील खाजगी उपसा सिंचन पाणीपट्टी दर हे १ जुलै, २०२३ ते ३० जून, २०२५ या उर्वरीत दोन वर्षाच्या कालावधीकरीता जलमापक यंत्र बसविली नसतील तर एकपट दरानेच आकारणी करण्याच्या अनुषंगाने जलप्रशुल्क निर्धारण आदेशामध्ये सुधारणा करण्याबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दिनांक २ फेब्रुवारी, २०२४ अन्वये ठोक जलप्रशुल्क निर्धारण सुधारणा आदेश निर्गमित केले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील खाजगी गृहनिर्माण संस्थेच्या आवारातील धोकादायक झाडे अथवा फांदया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निशुल्क तोडण्याबाबत

**(१९) २२१५५ (०५-०१-२०२४) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने नेमलेल्या पथकाद्वारे मुंबईतील खाजगी गृहनिर्माण संस्थेच्या आवारातील धोकादायक झाडे अथवा फांदया पावसाळयापूर्वी कोणतेही शुल्क न आकारता तोडण्याबाबतचे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिकेला देण्यात येतील, असे आश्वासन मा.नगरविकास मंत्री महोदयांनी महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन, २०२३ मध्ये विधानपरिषद सभागृहात दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आश्वासनाच्या अनुषंगाने याबाबतचे निर्देश शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्नुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत जोगेश्वरी(पूर्व) येथील बाळासाहेब ठाकरे रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(२०) २२७५३ (०५-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरित केलेल्या जोगेश्वरी (पूर्व) येथील बाळासाहेब ठाकरे रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम पश्चिम द्रुतगती महामार्गापासून वीरा देसाई मार्गापर्यंत अदयाप अपूर्ण असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे अपूर्ण बांधकाम पूर्ण करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त झालेली अंदाजे रुपये ३८५ कोटीर  रुपयांची रक्कम इतर अन्य ठिकाणी / अन्य कारणासाठी वापरण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाचे अपुर्ण असलेले बांधकाम पूर्ण करण्यासाठी अंदाजपत्रकानुसार आवश्यक निधी, संबंधित कंत्राटदार किती कालावधीत काम पूर्ण करणार आहे तसेच लिंक रोडपासून पूनम नगरपर्यंतच्या ५.०७ किमी लांबीच्या पुलाच्या बांधकामासाठीचा खर्च व पुलाचे बांधकाम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण करण्यास काही तबेले, दुकाने आणि अनधिकृत बांधकामे निष्कासित

करण्यास झालेल्या विलंबास दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आलेल्या रुपये ३८५ कोटी निधीचा वापर उड्डाणपुल व सलग्न भागाच्या स्थापत्य कामासाठी करण्यात येत आहे.
(३) दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे उर्वरीत उड्डाणपुलापैकी उड्डाणपुलाचा आणि मेट्रो संलग्न भागाचे काम पूर्ण करण्यात येत आहे. त्यासाठी सुमारे रुपये ३०४.६० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे बांधण्यात येत असलेला डबल डेकर उड्डाणपूल आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेने बांधलेला बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूल यांना जोडण्याचे काम प्राधिकरणाद्वारे स्वतंत्रपणे करण्यात येत आहे. सदर कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक ०१/१२/२०२३ रोजी देण्यात आलेला असून काम प्रगतीपथावर आहे. सदर कामासाठी रुपये ३७८.७० कोटी इतका खर्च अपेक्षित असून, सदर काम हे २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण करण्यास बाधित होत असलेल्या बहुतांश दुकाने आणि अनधिकृत बांधकामे बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे निष्कासित करण्यात आली आहेत. तसेच मिससिंग लिंक्स उड्डाणपुलाचे बांधकामासाठी बाधित होत असलेले बांधकामे यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे निष्कासित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.